आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२ नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि ग्रीसचे प्रधानमंत्री किरियाकोस मित्सोटाकिस यांच्यात दूरध्वनीवरून चर्चा, दोन्ही देशांमधली धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार

- चार धामपैकी एक असलेल्या उत्तराखंडमधल्या गंगोत्री धाम मंदिराचे दरवाजे आजपासून विधीपूर्वक बंद

- बलिप्रतिपदा म्हणजेच दिवाळी पाडव्यानिमित्त सर्वत्र खरेदीचा उत्साह, गोवर्धन पूजा ही संपन्न

- झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण, प्रचाराला आला वेग

- न्यूझीलंडविरोधातल्या तीसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात पहिल्या डावात भारताची न्यूझीलंडवर २८ धावांची आघाडी

**आणि**

- अमेरिकेच्या कोलोराडो इथं सुरू असलेल्या १९ वर्षांखालच्या जागतिक मुष्टीयुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारताची एक सुवर्ण, तीन रौप्य पदकांची कमाई

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि ग्रीसचे प्रधानमंत्री किरियाकोस मित्सोटाकिस यांनी दूरध्वनीवरून एकमेकांशी चर्चा केली आहे. या चर्चेत दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्याच्या वचनबद्धतेचा त्यांनी पुनरुच्चार केला आहे. दोन्ही नेत्यांनी भारत आणि मध्य पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर तसंच पश्चिम आशियातल्या घडामोडी यासह विविध प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचार विनिमय केला. व्यापार, संरक्षण, शिपिंग आणि कनेक्टिव्हिटी यासह द्विपक्षीय सहकार्याच्या अनेक क्षेत्रातल्या प्रगतीचा त्यांनी आढावा घेतला.

**<><><><><>**

उत्तराखंडमधल्या उत्तरकाशी जिल्ह्यातल्या चार धामपैकी एक असलेल्या गंगोत्री धामचे दरवाजे आजपासून बंद करण्यात आले आहेत. अन्नकूट उत्सवानिमित्त आज दुपारी सव्वा बारा वाजता अभिजीत मुहूर्तावर भाविकांच्या उपस्थितीत मंदिराचे दरवाजे विधीपूर्वक बंद करण्यात आले. दर वर्षी हिवाळ्यामध्ये गंगोत्री धामचे दरवाजे बंद करण्यात येतात. या वर्षी आतापर्यंत आठ लाखांहून अधिक भाविकांनी गंगोत्री धामला भेट दिली आहे. याशिवाय रुद्रप्रयागमधल्या केदारनाथ धाम आणि उत्तरकाशीतल्या यमुनोत्री धामचे दरवाजेही बंद करण्याची तयारी सुरू झाली आहे. उद्या भाऊबीज निमित्त या दोन्ही धामचे दरवाजे बंद राहणार आहेत.

**<><><><><>**

आज देशभरात गोवर्धन पूजा साजरी होत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गोवर्धन पूजेनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी गोवर्धन पूजा साजरी करण्याची परंपरा आहे. भगवान कृष्णांनी

गोवर्धन पर्वताद्वारे संपूर्ण जगाचे रक्षण केलं,  भगवान श्रीकृष्णाचा आशीर्वाद सर्वांना मिळो, असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे .

<><><><><>

आज कार्तिक शुद्ध प्रतिपदा, म्हणजेच बलिप्रतिपदा किंवा दिवाळी पाडवा. हा दिवस साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक मानला जातो. त्यामुळे चांगल्या उपक्रमांची सुरुवात किंवा  महत्त्वाची खरेदी आज केली जाते. घर, वाहन किंवा सोने खरेदीसाठी आजचा मुहूर्त साधण्याचा साधारण कल आहे. भेटवस्तू, तसंच मोबाईल फोन्स, आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदीही मोठ्या प्रमाणात होत आहे. मोठी दुकानं, मॉल्स, घाऊक बाजारपेठा, सराफकट्टे गजबजले आहेत. अनेकांनी ऑनलाईन खरेदीला पसंती दिली आहे. देशाच्या अनेक भागात हा नववर्षाचा प्रारंभ मानला जातो. गुजराती नववर्षानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर गुजराती भाषेत शुभेच्छा संदेश दिला आहे. हे नवीन वर्ष सर्वांसाठी आनंद, सफलता, आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवो, अशी कामना त्यांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं विविध राजकीय पक्ष या सणाचं औचित्य साधून अधिकाधिक मतदारांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न करत आहेत.

<><><><><>

राज्याची सध्याची स्थिती गंभीर असून ती बदलण्यासाठी सत्ताबदलाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे राज्याला पूर्वपदावर आणण्याची ताकद असणाऱ्यांना जनतेनं आपला कौल द्यावा आणि ती ताकद फक्त महाविकास आघाडीत आहे, असं प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केलं आहे. गोविंद बाग इथं ते पत्रकारांशी बोलत होते. राज्यात परिवर्तन आणण्याचा आणि राज्याच्या नागरिकांच्या जीवनात सुधारणा करण्याचा निर्धार आज

पाडव्याच्या दिवशी करायचा आहे, असं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचा, राज्याच्या आर्थिक स्थितीबाबतचा निष्कर्ष गंभीर आहे. सत्ताधाऱ्यांनी वेळीच याकडे लक्ष न दिल्याचा हा परिणाम आहे, असा आरोप त्यांनी केला. राज्यात जनहितासाठी राबवण्यात येत असलेल्या योजनांसाठीचा निधी सरकारनं गेल्या दोन-अडीच महिन्यांमध्ये दुसरीकडे वळवल्यानं लाभार्थ्यांच्या हातात काहीच पडलेलं नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने उमेदवार आणि निवडणूक यंत्रणा कार्यरत झाले आहेत. अहमदनगर जिल्ह्यात सुपा टोलनाक्यावर एका गाडीतून २३ कोटी ७१ लाख रुपये किमतीची सोन्याची बिस्किटं आणि चांदी जप्त केली. निवडणूक आयोगाचं पथक आणि पोलिसांनी या गाडीच्या संशयित हालचाली टिपून हटकलं आणि झडती घेतली तेव्हा हा मुद्देमाल मिळाला. ही गाडी छत्रपती संभाजीनगर कडून पुण्याकडे निघाली असल्याचं चालकानं सांगितलं. याप्रकरणी पुढचा तपास चालू आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज हिंगोली आणि परभणी जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

झारखंडमधील विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्या नंतर, आता या टप्प्यात तिथे ५२८ उमेदवार रिंगणात उरले आहेत. या टप्प्यासाठी अर्ज दाखल केलेल्यांपैकी बत्तीस उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. तिथे पहिल्या टप्प्यासाठी येत्या १३ नोव्हेंबरला, तर दुसऱ्या टप्प्यासाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यात ६८३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

निवडणुकीचं चित्र स्पष्ट झाल्यानंतर प्रचारानंही वेग घेतला असून, भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शहा आज रांचीला भेट देऊन प्रचाराचा तयारीचा आढावा घेतील, तसंच धालभूमगढ, घाटशिला, बरकट्ठा, सिमरीया इथं प्रचारसभांना संबोधित करतील.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मुंबईच्या वानखेडे मैदानावर सुरु असलेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात, भारतानं पहिल्या डावात न्यूझीलंडवर २८ धावांची नाममात्र आघाडी घेतली आहे. आज सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतानं आपला पहिला डाव, ४ बाद ८६ धावांवरून पुढे सुरू केला. काल नाबाद असलेल्या शुभमन गील आणि ऋषभ पंत यांनी पाचव्या गड्यासाठी ९६ धावांची भागिदारी करत भारताचा डाव सावरला. गील यानं ९० तर पंत यानं ६० धावांची खेळी केली. पंत झाल्यानंतर भारताचे उर्वरीत फलंदाज ठराविक अंतरानं बाद होत गेले आणि भारताचा पहिला डाव २६३ धावांत आटोपला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या दुसऱ्या डावात बिनबाद २ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

अमेरिकेच्या कोलोराडो इथं सुरू असलेल्या १९ वर्षांखालच्या जागतिक मुष्टीयुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या कृषा वर्मानं सुवर्णपदक  जिंकलं. तिनं जर्मनीच्या लेरिका हिचा ५-० असा पराभव केला. ४८ किलो वजनी गटात चंचल चौधरी, ५७ किलो वजनी गटात अंजली सिंग, तर पुरुषांच्या ७५ किलो वजनी गटात राहुल कुंडू यांना मात्र अंतिम फेरीत पराभूत व्हावं लागल्यानं रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं.

या स्पर्धेत आज महिलांच्या विविध वजनी गटात निशा, सुप्रिया देवी, पार्थवी ग्रेवाल यांच्यासह आणखी पाच जणी सुवर्णपदाच्या लढतीत सहभागी होतील, तर पुरुषांमध्ये हेमंत सांगवान ९० किलो वजनी गटात अंतिम सामना खेळणार आहे.

**<><><><>**

दक्षिण अफ्रिकेतल्या बोट्सवानाचे, सहावे राष्ट्राध्यक्ष म्हणून ड्यूमा बोको निवडून आले आहेत.तिथल्या मतदानाची अंतिम आकडेवारी अद्याप आलेली नाही, मात्र डेमोक्रेटिक चेंज पक्षानं संसदेत सर्वाधिक ३४ जागा जिंकल्या असून, विद्यमान सत्ताधआरी बोत्सवाना डेमोक्रेटिक पक्षाला चार जागाच जिंकता आल्या आहेत. मावळते राष्ट्राध्यक्ष मोकग्वेटसी यांनी आपण पराभव स्विकारत असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. बोटत्सवानात तब्बल सहा दशकांनंतर सत्तापालट झाला आहे.

**<><><><>**

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची ३५२वी बैठक जीनिव्हा इथं होत आहे. केंद्रसरकारच्या कामगार आणि रोजगार विभागाच्या सचिव सुमिता दावरा त्यात भारताचं प्रतिनिधित्व करीत आहेत. गरीबी आणि बेरोजगारीच्या निराकरणासाठी

केंद्रसरकार राबवत असलेल्या विविध योजनांची माहिती त्यांनी बैठकीत दिली. गेल्या ९ वर्षांत देशातली २४ कोटी ८० लाख लोकसंख्या गरीबीतून बाहेर आली असल्याचं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री जनधनयोजना, जीवनज्योती योजना, पीएम सुरक्षा विमा योजना यांचा उल्लेख त्यांनी केला.

**<><><><><>**

आपत्ती जोखीम कमी करण्याविषयी जी ट्वेंटी देशांच्या मंत्रिस्तरीय जाहीरनाम्याच्या मसुद्यावर सदस्य देशांची सहमती झाली आहे. जी ट्वेंटी देशांच्या संबंधित कार्यगटाची मंत्रिस्तरीय बैठक ब्राझिलमधे बेलेम इथं ३० ऑक्टोबरपासून कालपर्यंत झाली. प्रधानमंत्र्यांचे प्रधान सचिव पी. के. मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली भारताचं उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळ त्यात सहभागी झालं होतं. आपत्तीची पूर्वसूचना, आपत्तीकाळाचा विचार करुन प्रतिबंधक पायाभूत सुविधा, पुनर्वसन आणि या बाबींकरता वित्तपुरवठा या मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा झाली. या कार्यगटाची स्थापना जी ट्वेंटी परिषदेचं यजमानपद भारताकडे असताना झाली आहे.

**<><><><><>**

स्पेनमधे मुसळधार पावसानं आलेल्या पुरात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांची संख्या २०५ वर पोहोचली आहे. पुरात बेपत्ता झालेल्यांचा शोध अद्यापही सुरु आहे. ही पूरस्थिती आणखी बिकट होऊ शकते असा इशारा तिथल्या हवामान विभागानं दिला आहे. स्पेनचा नैऋत्य भाग विशेषतः  हुलवा प्रांत, तसंच स्पेनच्या पूर्वेकडील भागात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. दरम्यान या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर स्पेनमध्ये तीन दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा

जाहीर केला असून, तिथल्या सरकारी इमारतींवचे राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवले आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेच्या संरक्षण विभागाने यूक्रेनला सुमारे 425 दशलक्ष डॉलरचं अतिरिक्त अर्थ साहाय्य देण्याची घोषणा केली आहे. युक्रेनच्या संरक्षणविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी ही मदत देण्यात येणार आहे. यात क्षेपणास्त्र प्रणाली , दारूगोळा, वैद्यकीय उपकरणे, युद्धसामग्री इत्यादी गोष्टींचा समावेश आहे. अमेरिकेचा संरक्षण विभाग वर्ष २०२१ पासून युक्रेनला अर्थसाहाय्य देत आहे.

**<><><><><>**

फॅशनविश्वातलं प्रसिद्ध व्यक्तिमत्व रोहित बल याचं काल रात्री हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. ते 63 वर्षांचे होते. रोहित बल दीर्घकाळापासून हृदयविकारानं ग्रस्त होते. दिल्लीच्या मेदांता रुग्णालयात ते अतिदक्षता विभागात दाखल होते. नुकत्याच झालेल्या लॅक्मे फॅशन वीक ऑफ इंडियामध्ये व्यवसायिक फॅशन डिझायनर असलेल्या रोहित बल यांनी कायनात अ ब्लूम इन द युनिव्हर्स नावानं वस्त्राचं प्रदर्शन केलं ते शेवटचं प्रदर्शन ठरलं.

**<><><><><>**

पाकिस्तानमधल्या काल मस्तुंग जिल्ह्यात झालेल्या बॉम्बस्फोटात पाच मुलांसह नऊ जण ठार तर 29 जण जखमी झाले. मस्तुंग सिव्हिल हॉस्पिटलजवळच्या गर्ल्स हायस्कूल चौकात ही घटना घडली. मृतांमध्ये पाच मुली, एक मुलगा, एक पोलीस अधिकारी आणि इतर दोन नागरिकांचा समावेश आहे. या स्फोटात मरण पावलेली मुलं पाच ते दहा वयोगटातली होती.

**//<><><><><>//**